केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी यांच्या सहकार्याने 25 ऑक्सीजन कॉन्स्ट्रेटर उपलब्ध

आ. सुधीर मुनगंटीवार यांनी मानले नितीन गडकरी यांचे आभार

आणखी 150 ऑक्सीजन कॉन्स्ट्रेटर उपलब्ध होणार – आ. सुधीर मुनगंटीवार

केंद्रीय भुतल परिवहनमंत्री तथा ज्येष्ठ भाजपा नेते नितीनजी गडकरी यांच्या सहकार्याने बल्लारपूर, मुल , पोंभुर्णा आणि चंद्रपूर येथील रूग्णालयांसाठी 25 ऑक्सीजन कॉन्स्ट्रेटरचे वितरण माजी अर्थमंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

बल्लारपूर, मुल, पोंभुर्णा आणि चंद्रपूर येथील रूग्णालयांसाठी सदर 25 ऑक्सीजन कॉन्स्ट्रेटर दिनांक 4 मे रोजी वितरीत करण्यात आले. आ. सुधीर मुनगंटीवार यांनी केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी यांनी 25 ऑक्सीजन कॉन्स्ट्रेटर उपलब्ध करून दिले आहे. या आधी आमच्या विनंतीला मान देत चंद्रपूर जिल्हयातील जनतेच्या आरोग्य सुविधेच्या दृष्टीने ना. नितीनजी गडकरी यांनी 15 एनआयव्ही, 2 मिनी व्हेंटीलेटर आणि 15 मोठे व्हेंटीलेटर जिल्हा रूग्णालयाला उपलब्ध करून दिले आहेत. नितीनजी गडकरी यांचे चंद्रपूर जिल्हयावर विशेष प्रेम आहे. या जिल्हयाच्या विकासासाठी केंद्रीय मार्ग निधीच्या माध्यमातुन वेळोवेळी भरघोस निधी त्यांनी मंजुर केला आहे. या संकटसमयी देखील त्यांनी आपल्या सहकार्याचा हात चंद्रपूर जिल्हयातील जनतेला दिला आहे. लवकरच आणखी 150 ऑक्सीजन कॉन्स्ट्रेटर उपलब्ध होणार असल्याचे सांगत माजी अर्थमंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांनी नितीनजी गडकरी यांचे आभार मानले.

यावेळी पोंभुर्णा पंचायत समितीच्या सभापती अल्का आत्राम, जिल्हा परिषद सदस्य राहुल संतोषवार, मुल नगरपरिषदेचे उपाध्यक्ष नंदु रणदिवे, निलेश खरबडे, समिर केने, मनिष पांडे, सुभाष कासनगोट्टुवार, किशोर कापगते, प्रशांत समर्थ, अजित मंगळगिरीवार, ऋषी कोटरंगे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.